R.No. MHAMAR/25/A3029

दैनिक
# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ९५

दि.२६ मार्च २०२६,वारः गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## आज रामेश्वर येथे प्रभू श्रीराम जन्मसोहळा आणि 'श्रीराम' रथ उत्सवाचे आयोजन

लातूर – भारतीय संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, त्याग आणि समर्पणाचे मूर्तीमंत प्रतीक, समस्त भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेले भारतीय संस्कृती दर्शन 'श्रीराम' रथ यात्रा उत्सव आणि ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचा कीर्तन सोहळा लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रूई) येथे २६ मार्च २०२६ गुरुवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास रामेश्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.



रामेश्वर (रूई) येथे श्रीरामनवमीनिमित्त काढण्यात आलेली भव्य 'श्रीराम रथयात्रा'

पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का दादाराव कराड यांनी मानवता तीर्थ मौजे रामेश्वर (रूई) येथील श्रीराम मंदिरास अर्पण केलेल्या सुंदर, रेखीव व वैशिष्ट्यपूर्ण अशा भारतीय संस्कृती दर्शन-श्रीराम रथाची २६ मार्च २०२६ गुरुवार रोजी सकाळी ८ वाजता संपूर्ण भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने रामेश्वर गावात ग्रामप्रदक्षिणा रथयात्रा उत्सव आयोजित करण्यात आला असून या रथ यात्रेनंतर ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचे कीर्तन होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी प्रभू श्रीराम जयंती सोहळ्यानिमित्ताने श्री राम रथ उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या रथयात्रेत वाजंत्रीसह विविध भजनी मंडळी, टाळकरी, असंख्य भाविक भक्त सहभागी होणार आहेत. रामेश्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## देविदास काळेंनी घेतला विरोधी पक्ष नेत्याचा पदभार

लातूर/प्रतिनिधी : भारतीय जनता पक्षाने लातूर शहर महानगरपालिकेच्या



विरोधी पक्ष नेतेपदी देविदास काळे यांची नियुक्ती केल्यानंतर आज त्यांचा पदभार समारंभ भव्य रूपाने पार पडला. भाजपा प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व भाजपा लातूर शहर अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ संपन्न झाला. या पदभार समारंभ प्रसंगी प्रशासनाच्या वतीने आयुक्त मानसी मीना यांनी देविदास काळे यांचा सत्कार केला व त्यांना शुभेच्छा दिल्या. विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनीही डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, अजित पाटील कव्हेकर आणि आयुक्त मानसी मीना यांचा सत्कार केला.

विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना भाजपा शहर अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर म्हणाले, आज अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. भाजपा पक्ष लोककल्याणासाठी केंद्रबिंदू म्हणून काम करते. मनपात आज लोककल्याणकारी कार्यालयाची सुरुवात झाली असून, या कार्यालयात सर्वसामान्य कार्यकर्त्यांची कामे होणार आहेत. त्यामुळे या विरोधी पक्ष नेते दालनाला 'कार्यकर्ता मंदिर' म्हणून पाहिले पाहिजे. या कार्यकर्ता मंदिरातून प्रत्येक कार्यकर्त्यांना न्याय मिळेल आणि लातूरकरांनाही न्याय मिळवून देण्याचे काम इथून होणार आहे.

ते पुढे म्हणाले, सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्ष नेते देविदास काळे यांच्या माध्यमातून होणार आहे. भाजपचे प्रत्येक कार्यकर्ते या कार्यालयात भेट देऊन आपल्या प्रभागातील प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत. आयुक्त मानसी मीना यांना उद्देशून त्यांनी विनंती केली की, भाजपा कार्यकर्ते आणि नगरसेवकांच्या कामांना प्राधान्य द्यावे, तसेच त्यांना न्यायिक भूमिका देण्याचे काम आपल्या माध्यमातून व्हावे कारण प्रशासनातील काही अधिकारी सत्ताधाऱ्यांच्या सांगण्यावरून काम करत असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रसंगी विरोधी पक्षनेत्यांना पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर बोलताना भाजपा प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी आपल्या भाषणात सांगितले, आज महत्त्वाचा दिवस आहे. देविदास काळे यांच्या माध्यमातून लोककल्याणकारी कामे होतील. सत्ताधाऱ्यांची संख्या जास्त असली तरी त्यांच्यापेक्षा अधिक प्रभावी काम करून आपण लातूरकरांचे मन जिंकावे. विरोधी पक्षाचे दालन सर्वांसाठी खुले आहे आणि येथे २४ द ७ तास काम केले जाईल. त्यांनी हरलेल्या उमेदवारांना संबोधित करताना म्हटले, जे मनपा निवडणुकीत हारले त्यांना मी 'हारले' म्हणणार नाही, तर 'लढले' असे म्हणेन. त्यांनीही आपल्या प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी विरोधी पक्ष नेत्याशी संपर्क साधावा. आपल्या कामातून सत्ताधाऱ्यांची मक्तेदारी तोडावी.

ते पुढे म्हणाल्या, राज्यात आणि केंद्रात भाजपाचे सरकार असल्याने शहराच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न केला जाईल. सत्ताधाऱ्यांची कामे शहराच्या विकासाला खीळ घालणारी आहेत, हे जिल्हा नियोजन समितीच्या कामांना स्थगिती देऊन दाखवले आहे. येणाऱ्या काळात सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करावे लागेल. कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्यांनी विश्वास दिला की, प्रभागातील प्रश्न सोडवण्यासाठी अग्रेसर राहा, अडचण आली तर आम्ही तुमच्यासोबत आहोत.

देविदास काळे यांचे आक्रमक आश्वासन

पदभार स्वीकारताना आणि सत्काराला उत्तर देताना देविदास काळे म्हणाले, येणाऱ्या काळात सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर लातूरकरांच्या प्रश्नांसाठी भाजपा आक्रमकपणे काम करणार आहे. साडेतीन वर्षांच्या प्रशासकीय काळातून प्रशासन बाहेर आले नाही, त्यांनाही जाब विचारला जाईल. पालिकेला आर्थिक शिस्त लावणे, कर्मचाऱ्यांच्या पगार वेळेवर होणे याकडे लक्ष दिले जाईल.

ते पुढे म्हणाले, लातूरकरांनी आम्हाला विरोधात बसवले तरी सत्ताधाऱ्यांकडून योग्य काम करून घेण्याची भूमिका आमची राहणार आहे. मनपा कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य लातूरकरांना कोणतीही अडचण येणार नाही, यासाठी भाजपा अग्रेसर राहील. शहरातील कचरा, स्वच्छता, दिवाबत्ती, पाणीपुरवठा, ट्राफिक यासारख्या मूलभूत प्रश्नांवर जातीने लक्ष देऊन ते सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. विकास कामे वेळेत आणि दर्जेदार होण्यासाठी सत्ताधाऱ्यांना जाब विचारला जाईल.

देविदास काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले, माजी पालकमंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड यांचे आभार मानले आणि पक्षाने दिलेल्या संधीचे सोने करण्याची ग्वाही दिली. पक्षातील सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम केले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

समारंभात उपस्थित राहिल्याबद्दल डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांचे आभार मानले. या प्रसंगी भाजपाच्या अनेक नगरसेवकांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी देविदास काळे यांना शुभेच्छा दिल्या. हा पदभार समारंभ भाजपासाठी नव्या उर्जेचा प्रारंभ मानला जात आहे. या पदभार समारंभास प्रविण कस्तुरे, उध्दव तेलंग, ऋषी राजे, भीमाशंकर बेंबळकर, ड. प्रदीप मोरे, करुणा शिंदे, स्वाती घोरपडे, राजश्री बाहेती, संजय गीर, पुनित पाटील यासह अनेक नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सचिव स्तरीय समितीने उपाययोजना करावी–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : दरवर्षी कांद्याचा प्रश्न राज्यात उपस्थित होत असतो. या प्रश्नावर कायम स्वरुपी तोडगा काढण्याची गरज आहे. सद्यस्थितीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करावी लागणार आहे. यासाठी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव आणि पणन विभागाचे सचिव यांची समिती स्थापन करण्यात येईल. या समितीने शेतकऱ्यांना तातडीने करता येणाऱ्या उपायोजना सुचवाव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. कांदा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी यंत्रणांनी दीर्घकालीन पर्यायांची अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.




कांदा प्रश्न बाबत विधान भवनात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पणन मंत्री जयकुमार रावल, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कांदा व्यापारामध्ये होत असलेले गैरप्रकार रोखणे आणि कांद्याचे निर्यात वाढवून कांद्याचे दर स्थिर ठेवणे आदी केंद्र शासनाशी निगडित विषयांबाबत केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांच्यासोबत बैठक घेण्यात येईल. तसेच दीर्घकालीन उपाययोजनाबाबत चर्चा करण्यात येईल. कांद्याचे उत्पादन निश्चितच वाढले आहे. वाढत्या उत्पादनाला बाजारपेठ निर्माण करून देणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांकडून व्यापारी कांदा घेऊन हा व्यापारीच कांदा नाफेड किंवा अन्य यंत्रणांना विक्री करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असून हे कायमस्वरूपी थांबविणे गरजेचे आहे. नाशिक, पुणे, अहिल्यानगर व सोलापूर या जास्त कांदा उत्पादक जिल्ह्यांमध्ये ' क्रॉप डायव्हर्सिफिकेशन' करता येईल का याबाबतही समितीने पडताळणी करावी. येणाऱ्या खरीप हंगामातच हा प्रयोग करण्यात यावा. कांद्यामध्ये पण 'क्रॉप डायव्हरसिफिकेशन' करणे गरजेचे आहे. यामध्ये वाणांची निवड, होणारे उत्पादन आदी बाबी निश्चितच तपासल्या पाहिजेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

शेतकऱ्यांना कांदा पिकाला जास्त उत्पन्न मिळवून देणाऱ्या पिकाकडे वळवावे लागेल. पुढील दोन ते तीन वर्षांमध्ये अशारीतीने कार्यपद्धती केल्यास कांद्याचे उत्पादन आणि पुरवठा हा शेतकऱ्यांना फायद्याचा होईल. सध्या कांद्याचे उत्पादन वाढवून शासनाला पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे शेतकऱ्यांना मदतही करावी लागते. यामध्ये शेतकऱ्याचे नुकसानच होते. या परिस्थितीतून शेतकऱ्यांना बाहेर काढायचे असल्यास दीर्घकालीन उपायोजना आवश्यक आहेत. या समितीने सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन अल्पकालीन उपायोजना सुचवाव्यात. तसेच पुढील दोन ते तीन महिन्यात दीर्घकालीन उपाययोजना निश्चित करून त्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

बैठकीला आमदार सर्वश्री सदाभाऊ खोत, दिलीप बनकर, राहुल आहेर, विक्रम पाचपुते, किशोर पाटील, शरद सोनवणे, राम भदाणे, काशिनाथ दाते, नितीन पवार, आशुतोष काळे, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, तसेच संबंधित यंत्रणांचे अधिकारी, कांदा निर्यातदार उपस्थित होते.

## संपादकीय...

### सम्राट अशोक जयंती : मानवतेचा, धम्माचा आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श

भारतीय इतिहासातील सर्वात महान आणि दूरदृष्टी असलेल्या सम्राटांमध्ये सम्राट अशोका यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नव्हे, तर वर्तमानाला दिशा देणारा विचार समजून घेणे होय.

सम्राट अशोक हे मौर्य साम्राज्याचे तिसरे सम्राट होते. त्यांच्या कारकिर्दीत भारतीय उपखंडातील बहुतेक भाग एकसंध सत्तेखाली आला. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे त्यांनी एक सक्षम, संघटित आणि शक्तिशाली साम्राज्य उभारले.

अशोकांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक लढाया जिंकल्या. त्यामध्ये कलिंग युद्ध विशेष महत्त्वाचे ठरते. या युद्धात लाखो लोकांचा मृत्यू झाला आणि असंख्य लोक जखमी झाले. या भीषण हानीने अशोकांच्या मनावर खोल परिणाम झाला.

कलिंग युद्धानंतर अशोकांनी आत्मपरीक्षण केले आणि हिंसेचा मार्ग सोडून दिला. त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला आणि आपल्या आयुष्याला नवी दिशा दिली. हा परिवर्तनाचा क्षण त्यांच्या जीवनातील सर्वात मोठा टप्पा मानला जातो.

बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर सम्राट अशोका यांनी 'धम्म' या तत्त्वज्ञानाचा प्रसार सुरू केला. धम्म म्हणजे केवळ धर्म नसून नैतिक आचरण, दया, करुणा, सत्य, सहिष्णुता आणि सर्व धर्मांचा आदर यांचा समन्वय होय.

अशोकांनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी शिलालेख आणि स्तंभांचा प्रभावी वापर केला. भारतभर त्यांनी दगडी शिलालेख उभारले, ज्यामध्ये प्रजेने कसे वागावे, समाजात सौहार्द कसे टिकवावे आणि नैतिक जीवन कसे जगावे याबाबत मार्गदर्शन केले.

त्यांच्या प्रशासनाची सर्वात मोठी वैशिष्ट्य म्हणजे लोककल्याणकारी धोरणे. त्यांनी रस्ते बांधले, विहिरी खोदल्या, धर्मशाळा उभारल्या आणि औषधालयांची निर्मिती केली. मानवांसोबतच प्राण्यांसाठीही वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या.

अशोकांनी न्यायव्यवस्थेला विशेष महत्त्व दिले. त्यांनी अधिकाऱ्यांना प्रजेबद्दल संवेदनशील राहण्याचे आणि न्यायाने वागण्याचे आदेश दिले. लोकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी विशेष यंत्रणा उभारली.

त्यांनी धर्मनिरपेक्षतेचा आदर्श मांडला. सर्व धर्मांबद्दल आदर ठेवावा आणि कोणावरही धर्म लादू नये, हा त्यांचा स्पष्ट संदेश होता. आजच्या बहुसांस्कृतिक समाजासाठी हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

बौद्ध धम्माचा प्रसार करण्यासाठी अशोकांनी देश-विदेशात धम्मदूत पाठवले. श्रीलंका, नेपाळ, तिबेट, चीन आणि इतर आशियाई देशांमध्ये बौद्ध धर्म पोहोचवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

इतिहासात असे उल्लेख आढळतात की, त्यांनी हजारो बौद्ध विहार आणि स्तूप उभारले. त्यामुळे बौद्ध संस्कृती आणि वास्तुकलेचा मोठा विकास झाला.

तसेच तक्षशिला युनिव्हर्सिटी सारख्या शिक्षणकेंद्रांना त्यांनी प्रोत्साहन दिले. शिक्षण आणि ज्ञानाचा प्रसार हा त्यांच्या धोरणाचा महत्त्वाचा भाग होता.

अशोकांनी प्रशासनात नैतिकतेचा समावेश केला. 'धम्म महामात्र' या अधिकाऱ्यांची नेमणूक करून त्यांनी समाजातील नैतिक मूल्ये जपण्यावर भर दिला.

त्यांच्या कारकिर्दीत भारताचा सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक विकास झाला. त्यांनी सत्ता ही केवळ राज्य करण्यासाठी नसून लोकांच्या कल्याणासाठी असते, हे दाखवून दिले.

आजच्या काळात, जिथे हिंसा, द्वेष आणि असहिष्णुता वाढताना दिसते, तिथे सम्राट अशोकांचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. शांतता, बंधुभाव आणि मानवतेचा मार्ग स्वीकारणे हीच खरी प्रगती आहे.

सम्राट अशोक जयंती हा दिवस त्यांच्या महान कार्याची आठवण करून देतो. त्यांच्या धम्मनीतीचा अवलंब करून समाजात सौहार्द, न्याय आणि शांतता प्रस्थापित करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

# संपूर्ण सृष्टीच्या कल्याणासाठी प्रभु रामचंद्राचे आदर्श सर्वांनीच अंगीकारले पाहिजे.




चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्माच्या नवीन वर्षाची सुरुवात, या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते.महाराष्ट्रात नवीन वर्ष गुढीपाडवा म्हणून साजरा केला जातो तर इतर राज्यांत वेगवेगळ्या पध्दतीने हा सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केल्या जातो.याच महीण्यात चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच महीण्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला.म्हणजे चैत्र महिन्यात मर्यादापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. यामुळे संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरी करण्यात येते. रामनवमीला भजन, कीर्तन, पालखी व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते.आज जगात ज्या-ज्या ठीकाणी सत्यता व संयमता दिसून येते यामागे मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचीच लिला आहे. भारतात बहुसंख्य हिंदू असतांना सुध्दा सर्व धर्मांना घेऊन चालण्याचा मान फक्त भारतीय संस्कृतीमध्येच आहे. कारण संस्कृती,सन्मान,सभ्यता,संयमता, दृढनिश्चयता, आपुलकीची भावना आणि सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची क्षमता फक्त भारतीय संस्कृतीमध्येच दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात.त्यामुळे संपूर्ण हिंदु धर्म राममंदिर बांधकामाच्या प्रतीक्षेत होता आणि ते साध्य झाले.त्यामुळे आज आपल्याला अयोध्येत भव्य राममंदिर दिसून येते.आज भारतात हिंदू धर्मामध्ये संयमता दिसून येते ती फक्त प्रभूरामचंद्राच्या आशीर्वादिनेच.यामुळे विदेशी नागरिकांची जगातील पहीली पसंती भारत असल्याचे दिसून येते.यामागे फक्त प्रभू रामचंद्रांचेच आदर्श म्हणावे लागेल व आहे. प्रभूरामचंद्राचा आशिर्वाद भारतीयांना आहे.त्यामुळे या धर्तीवर प्रभूश्रीराम सर्वांचेच आहे आणि राहील. कारण अयोध्येत राम जन्मले हे वास्तव्य आहे याची पुष्टी भारतीय पुरातत्त्व विभाग व विदेशातील अनेक पुरातत्त्व विभागाने जाहीर केले आहे.श्री रामाचा जप आपण जन्म पासून तर शेवटपर्यंत करीत असतो. त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी रामाचे नामस्मरण करून येणाऱ्या अडचणी व दुःख दूर करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रभूराम सर्वांच्या मनात, हृदयात, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन,निसर्ग,वन्यप्राणी,मानव-जिवजंतु यांच्या मना-मनात वावरत असतो.त्यामुळेच जगातील इतर देशांच्या तुलनेत प्रत्येक विदेशी नागरिकाची पहीली पसंत भारत असल्याचे दिसून येते.कारण भारतात सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा, साधुसंतांचा व थोरमहात्म्याचा वास आहे. त्यामुळे भारतवासी एकोप्याने राहतात.आज जगात भारत विश्व शांतीचे प्रतीक आहे हे फक्त प्रभू रामचंद्रांच्या आदर्शामुळे. त्यामुळे प्रभूरामचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्माला ग्यात आहेच. अयोध्येतील राममंदिर भारतीयांच्या मदतीने एवढे भव्य झाले आहे की त्याची संपूर्ण जगात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटनाला चालना देणारे ठीकाण बनलेले आहे.त्याचप्रमाणे सात अजुब्यातुन राममंदिर प्रथम क्रमांकावर असल्याचे मी समजतो. त्यामुळे राममंदिर ते राष्ट्रमंदिर ही भुमिका सर्वांनीच अंगीकारली पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदूसंस्कृती जोपासण्याकरीता देशातील प्रत्येक हिंदूनी नवनिर्माण अयोध्येतील राम मंदिरात जाऊन रामाचे चरन स्पर्श केलेच पाहिजे.भारतातील प्रत्येक धर्माच्या लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की श्रीराम सर्वांचे आहे व राहील. श्रीरामाने १४ वर्षे वनवास भोगला,वालीसारख्या अहंकारी शक्तीचा सर्वनाश केला,ऋषि-मुनी,साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले,रावनासारख्या असुर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापणा झाली व सत्ययुग प्रस्तापीत झाले आणि तेव्हापासूनच सर्वांच्या मनात प्रभूरामचंद्राची धुंद गुंजतांना दिसते.तीच प्रतीकृती आज अयोध्येमध्ये साकार झाली आहे हे हिंदू धर्माचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.आज अयोध्येतील राम मंदिरमुळे मन में राम,तन मे राम,घर-घर मे राम या आवाजाची गुंज आपल्याला संपूर्ण भारतात ऐकायला व पहायला मिळत आहे. आजही जगात अनेक देशांमध्ये हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते व हिंदू संस्कृतीचा इतिहास सुध्दा दिसून येतो.यामागचे मुख्य कारण म्हणजे श्रीरामांचे आदर्श आहे.श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भारतासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते. तेव्हाच प्रभुश्रीरामचंद्रांना मर्यादापुरुषोत्तम म्हटल्या जाते.प्रभु राम सत्यतेचे प्रतीक आहे.त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक, राजकीय पुढारी यांनी करून जनसेवा करण्याची नितांत गरज आहे.कारण देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी अहंकारी, स्वार्थीवृत्तीचे असल्यामुळे भ्रष्टाचाराने लिप्त आहेत व मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवली आहे.या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवेपेक्षा स्वतःची सेवा करण्यात मग्न(गुंग)असतात.मु मे राम बगल में छुरी अशा प्रकारची असुरी भावना आजच्या ९५ टक्के राजकीय पुढाऱ्यांत दिसून येते.कारण गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पीवुन आजचा ९५ टक्के राजकीय पुढारी रक्तबीज राक्षसाची भुमिका बजावीतांना दिसून येते.त्यामुळेच देशात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. आज देशातील प्रत्येक आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री व अनेक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे. यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण,महागडे शिक्षण,शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य विषयक समस्या व शेतकऱ्यांच्या आत्महत्यां यांनी जन्म घेतला आहे.मी रामनवमीच्या निमित्ताने देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की रामराज्याची संकल्पना साकार करायची असेल तर आपण वाममार्गाने कमवीलेली व भ्रष्टाचार रूपाने कमविलेल्या संपूर्ण संपत्तीचा त्याग करून सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावा यातच खरे प्रभु श्रीराम यांचे आदर्श दिसून येईल. त्याचप्रमाणे भुकेलेल्यांना अन्न हा देवी-देवतांचा मुलमंत्र आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी अंगीकारला पाहिजे.राजकीय पुढाऱ्यांनी गरीब व सर्वसामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाजकार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल. जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही.याकरीता भ्रष्टाचारावर आळा व अहंकारी राजकीय पुढाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची कठोर चौकशी करून यांची संपत्ती जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. यातच आपल्याला रामराज्य खऱ्या अर्थाने दिसून येईल. आजचा राजकीय पुढारी स्वार्थी झाल्यामुळे व यांच्यात असुरी शक्ती निर्माण झाल्याने देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत.त्यामुळे देशाच्या १४० कोटी जनतेला आज महागाईचा श्राप बसल्याचे दिसून येते.या असुरी शक्तीला संपवायचे असेल तर प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोरं ठेऊन राजकीय पुढाऱ्यांनी समाजकार्य करायला हवे.तेव्हाच भारतात रामराज्य प्रस्थापित होईल. रामनवमीच्या पावन दिवसांचे औचित्य साधून संपूर्ण रामभक्तांनी, सामाजिक संघटनांनी, प्रशासनाने व सरकारने आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून वाढत्या प्रदुषणावर व बदलत्या हवामानावर आवर घालण्यासाठी वृक्षारोपण करून एक आगळावेगळा उपक्रम राबविला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईल व आपल्याला प्रत्येक पानात, फुलात,फळात प्रभु श्रीरामचंद्राचे दर्शन अवश्य होईल.कारण निसर्गाच्या सान्निध्यातच प्रभु रामचंद्र आहेत. जय श्रीराम!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

### शासकीय व खाजगी आस्थापनातील अंतर्गत समितीची नोंदणी 'शी-बॉक्स' पोर्टलवर करणे अनिवार्य महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे

मुंबई: महिलांच्या सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यपरिसरासाठी प्रत्येक शासकीय व खाजगी आस्थापनात अंतर्गत समिती स्थापन करणे बंधनकारक असून, या समितीची नोंदणी केंद्र शासनाच्या 'शी-बॉक्स' (ड्हश-डे) पोर्टलवर करणे आवश्यक असल्याचे आवाहन महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.राज्यात आतापर्यंत २२,०५२ आस्थापनांनी या पोर्टलवर नोंदणी केली असून, उर्वरित आस्थापनांनीही तातडीने नोंदणी करावी, अन्यथा संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय विभाग आणि खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत समिती गठित करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळ रोखण्यासाठी 'महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३' ची देशभरात काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे. या अनुषंगाने, प्रत्येक कार्यालयात महिला तक्रार निवारण समितीची माहिती दर्शनी भागात फलकाद्वारे स्पष्टपणे प्रदर्शित करणेही आवश्यक आहे. जर कोणत्याही आस्थापनात असा फलक दिसत नसेल, तर नागरिकांनी १८१ या टोल-फ्री क्रमांकावर किंवा 'शी-बॉक्स' पोर्टलवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी ही यंत्रणा अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व आस्थापनांनी सहकार्य करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# उन्हाळ्यातील वाढत्या तापमानात आरोग्य सांभाळा...!

सध्या वातावरणातील होणाऱ्या बदलामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे.त्यामुळे हवामान खात्याच्या अंदाजानुसार मार्च महिन्यापासुनच आपण राज्यातील अनेक भागात तापमान वाढताना पाहत आहोत. सर्व साधारणपणे एखाद्या प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ अंश सेल्सियसने जास्त असेल तर त्याला उष्णतेची लाट असे संबोधतात किंवा सलग दोन दिवस एखाद्या भागात तापमान ४५ अंश सेल्सियस पेक्षा जास्त असेल तर त्याभागात उष्णतेची लाट आली असे म्हटले जाते. सर्वसाधारणपणे सन बर्न, हिट क्रॅम्प्स (उष्णतेमुळे स्नायुंना गोळे येणे), हिट एग्जोर्शन (उष्णतेमुळे प्रचंड थकवा), हिट स्ट्रोक (उष्माघात) यांसारखे प्रामुख्याने उष्णताविकार असून साधारण एप्रिल, मे या महिन्यात उष्माघाताचा प्रादुर्भाव होत असतो.

उष्माघातासाठी अती जोखमीचे घटक
उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक
वृद्ध व्यक्ती व लहान मुले
गरोदर महिला
स्थूल व्यक्ती व पुरेशी झोप न झालेले व्यक्ती
मधुमेह, हृदयविकार, दारूचे व्यसन असणारे लोक
घट्ट कपडे घातलेले लोक, निराश्रीत, घरदार नसलेले गरीब लोक
रखान्यात बॉयलर जवळ काम करणारे लोक

अशा अति जोखमीच्या लोकांना उष्माघाताचा धोका असून विशेषतः त्यांनी उष्णतेच्या लाटेदरम्यान विशेष काळजी घेतली पाहीजे. उष्णतेमुळे होणारा शारीरिक त्रास किरकोळ स्वरूपाच्या किंवा गंभीर स्वरूपाचा असतो.

लक्षणे-किरकोळ त्रासात उष्णतेमुळे थकवा येणे, ताप येणे, शरीरावर रॉश उमटणे, हातापायाला गोळे येणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसून येतात.

गंभीर त्रासात उष्माघात होऊन त्वचा गरम व कोरडी पडणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, नाडीचे ठोके वेगात व जोऱ्यात असणे, मानसिक बेचैनी व अस्वस्थता, बेशुध्द अवस्था अशा लक्षणासह मृत्यूही होऊ शकतो.

प्रतिबंधात्मक उपाय -हे करा- पुरेसे पाणी प्या, प्रवासात पाणी सोबत ठेवा, हलक्या वजनाचे फिकट रंगाचे (पांढरे) सैलसर कपडे वापर. उन्हात चष्मा, छत्री, टोपी व पादत्राणे वापर. ओलसर पडदे (वाळ्याचे), पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा. शक्य असल्यास उन्हात जाण्यापुर्वी सनस्क्रिन क्रिम वापरा किंवा कोरफडीचा गर लावा. शरबत किंवा जलसंजीवनीचा वापर करा.

हे करू नये- कष्टाची कामे उन्हात करू नका. शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाने टाळा. लहान मुलांना पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नका. गडद रंगाचे तंग कपडे वापरू नका. मद्यपान, चहा, कॉफी, सॉफ्टड्रिंक टाळा. खुप प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. उन्हाच्या काळात भर दुपारी स्वयंपाक करणे टाळा, स्वयंपाकघर हवेशीर ठेवा.

प्रथोमचार- रुग्णास वातानुकुलीत खोलीत ठेवावे अथवा हवेशीर खोलीत ठेवावे. खोलीत पंखे कुलर ठेवावे. रुग्णाचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रुग्णास थंड पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. आईसपॅक लावावेत. रुग्णाला जवळच्या आरोग्य केंद्रात घेऊन जावे.

आरोग्य विभागाचे नागरिकांना आवाहन- जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व इतर शासकीय दवाखान्यात उन्हाळ्याच्या पूर्वतयारी अनुषंगाने आरोग्य विभागामार्फत उष्माघात कक्ष स्थापना, मुबलक औषधी साठा उपलब्धता, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी प्रशिक्षण, आरोग्य शिक्षण, जनजागृती इत्यादी उपाययोजना करण्यात आलेल्या असून ग्रामीण आरोग्य यंत्रणा सतर्क व सज्ज ठेवण्यात आलेली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आगामी दिवसांमध्ये जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते, अशा परिस्थितीत विविध उष्णताविकार अथवा उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी आता पासूनच सजग रहावे व प्रतिबंधात्मक उपायावर अधिक भर द्यावा. तसेच उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार करून घ्यावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राहुलकुमार मीना, आरोग्य विभागाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा नोडल अधिकारी डॉ सुनील भागवत यांनी केले आहे.

# अशोक खरात या नराधमाला फाशीची शिक्षा व मदत करणाऱ्या दिग्गजांना कठोर शिक्षा होईल का?

महाराष्ट्राच्या इतिहासातील अशोक खरात या नालायक नराधमाने विकृतीची हद पार करून भयावह कृत्य केले आहे ज्याची कल्पना करणे कठीण आहे आणि ही आता महाराष्ट्राची एपस्टीन फाईल्स झाली आहे.त्यामुळे ही संपूर्ण चौकशी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून व्हायला पाहिजे.असे वाटते की भोंदूबाबा अशोक खरात त्यांना मदत करणारे राजकीय पुढारी यांनी आतापर्यंत डोळ्यांवर पट्टी का बांधली होती?खरात सोबत दिर्घकाळ चर्चा करणारे राजकीय पुढारी यांना खरातच्या कुकृत्याची खबर कशी काय लागली नाही? त्याच्या जवळ व त्यांच्या सहकाऱ्यांजवळ करोडोंची संपत्ती आली कोठून?खरातला खतपाणी कोण घालायचे? असे अनेक प्रश्न आज सर्वसामाण्यांच्या मनात भेडसावत आहे.आज आपण मिडियाच्या माध्यमातून पहातो की नालायक अशोक खरात सोबत अनेक दिग्गज नेत्यांचे फोटो आहेत.याचाच अर्थ असा की,या दिग्गज राजकीय पुढाऱ्यांचा अशोक खरात सोबत कुठेतरी काहीतरी अवश्य संबंध असायलाच पाहिजे.रुपाली चाकणकर ह्या महिला आयोगाच्या जबाबदार अध्यक्षा होत्या.महिला आयोगाचे पद महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व अत्याचाराच्या दृष्टीकोनातून निराकरण करण्यासाठी निर्णय देणारे उच्च पद आहे जेणेकरून पिडित महिलांना योग्य न्याय मिळावा व समाजात सर्व काही सुरळीत रहावे.परंतु रूपाली चाकणकर यांनी महिलांना न्याय देण्याचे सोडून अशोक खरात सारख्या भोंदू बाबाच्या नांदी लागुन व त्यांचे पाय धुवून अनेक महिलांचे वाटोळे केले.रूपाली चाकणकरांचे काम झाले की,लोका सांगे ब्रह्मज्ञान व स्वतः कोरडे पाषाण.आपण पहातो की मिडियाच्या माध्यमातून अशोक खरात याचे १०० हुन अधिक अश्लील व्हिडिओ सामोर



आले आहेत यावरून आपण समजू शकतो की खरात यांची विकृती किती शिगेला पोहोचली होती आणि खालच्या स्तरावर जावून ठेपली होती आणि अशा नराधमाचे पाय सुरक्षित माजी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर धुतात आणि राजकीय पुढारी त्यांच्या पायापडतात ही कीती शरमेची आणि लाजिरवाणी बाब आहे.मी तर म्हणेल की, ज्या-ज्या राजकीय पुढाऱ्यांचे घनिष्ठ संबंध होते अशा सर्वांनाच सरकारने सह आरोपी बनवायला पाहिजे .कारण खरातनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला कलंकित केले आहे. त्याचप्रमाणे अशोक खरात सोबत ज्या -ज्या दिग्गज नेत्यांचे फोटो किंवा बैठका झाल्या आहेत त्यांचीही चौकशी होणे गरजेचे आहे.कारण अशोक खरात विकृत होताच परंतु सेक्स रॅकेट चालवायचा का? याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.ज्याप्रमाणे एखाद्या गुन्हेगारासोबत सर्वसामान्य व्यक्तीचा फोटो असतो अशा परिस्थितीत पोलीस विभाग सर्वसामान्य व्यक्तीची कसून चौकशी करीत असतो वेळ पडल्यास तुरूंगात सुद्धा टाकतो. अशाचप्रकारे अशोक खरात सोबत संबंध असणारे व त्यांच्या सोबत फोटोत असणारे या सर्वांचीच कसुन चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण विकृतीची सिमा ओलांडणारा खरात यांच्या जवळ करोडोंची संपत्ती आली कोठून याची चौकशी करण्यासाठी त्यांच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांची चौकशी आवश्यक आहे.खरात हा राज्यासह देशाचा मोठा गुन्हेगार आहे, महिलांचा गुन्हेगार आहे,पिडीतांचा गुन्हेगार आहेत, सर्वसामान्यांचा गुन्हेगार आहे आणि अनेकांची संपत्ती हडपण्याचे काम खरात यानी केले आहे त्यामुळे त्याच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांची चौकशी होणे गरजेचे आहे तेंव्हाच सत्य सामोर येईल. कारण खरातच्या या प्रकरणावरून असे लक्षात येते की,यात मोठमोठे मासे अडकु शकतात यालाही नाकारता येत नाही.आपण जेव्हा समान कायदा किंवा समान अधिकार म्हणतो तेव्हा खरातच्या केसमध्ये सर्वांनीच खुलुन सुरक्षा विभाग,पोलीस विभाग यांना सर्वतोपरी सहकार्य करने आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्या-ज्या महिलांवर अत्याचार झाले आहेत किंवा खरातनी ब्लॅकमेल करण्याचे प्रयत्न केले आहे अशा सर्वांनी पोलीस यंत्रणेला मदत करून या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश केला पाहिजे जेणेकरून असे घृणास्पद कृत्य भविष्यात कोणीही करू शकणार नाही.भोंदू खरातने नरबळी व पशुबळी दिल्याचेही सांगितले जाते त्यामुळे खरात विकृत,नालायक आहेच सोबतच सर्वसामान्यांचा मोठा हत्यारा सुध्दा आहे. त्यामुळे त्याच्या सोबत असणाऱ्यांचा किंवा फोटोंमध्ये असणाऱ्यांची कसून चौकशी व्हायलाच पाहिजे तेव्हाच दुध का दुध पाणी का पाणी होईल.राजकीय पुढारी प्रथम खरातला भेटले तेव्हा चांगले बाबा होते आणि आता भोंदूबाबा म्हणतात याची लाज व शरम खरातला भेटणाऱ्या राजकीय पुढारी व सेलिब्रिटीला वाटायला पाहिजे.यावरून स्पष्ट होते की, राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी आणि अस्तित्वासाठी भोंदूबाबांना सुध्दा जवळ करतात.खरातने शेतकऱ्यांची जमीन लुबाडली धरणाचे पाणी आपल्या शेतात वळवते केले तेव्हा राजकीय पुढारी खरातच्या पायाशी लोळत होते आणि आता भोंदूबाबा म्हणून पळ काढण्याचा प्रयत्न राजकीय पुढारी करीत आहे ही बाब सामान्य माणूस व कायदा कदापि सहन करणार नाही. जोपर्यंत भोंदूबाबा प्रकरणात राजकीय पुढाऱ्यांवर कठोर कारवाई किंवा चौकशी होत नाही तोपर्यंत समाजाला व सर्वसामान्यांना योग्य न्याय मिळणार नाही.खरातचे आता जेवढे काही व्हिडिओ व्हायरल झाले आहेत ते फक्त ५० टक्के असावेत यापुढे आणखी मोठा उलघडा होऊ शकतो.कारण खरात राजकीय पुढाऱ्यांच्या मदतीने सेक्स कैन्डलसह अनेक कारनामे करीत असावेत अशीही शंका निर्माण होत आहे,याचाही खुलासा व्हायला हवा. राज्याची सुरक्षा यंत्रणा,पोलीस यंत्रणा व एसआयटी सह स्थानिक पोलिस यंत्रणा अत्यंत शिताफीने कार्य करीत आहेत आणि त्यांचे कार्य प्रशंसनीय आहे.अशा परिस्थितीत सरकारने, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, राजकीय पुढारी यांनी सुरक्षा यंत्रणेला सर्वतोपरी सहकार्य केले पाहिजे.ज्या-ज्या राजकीय पुढाऱ्यांचे खरात सोबत चर्चा करतांनाचे फोटो आहेत त्यांना सुध्दा सह आरोपी बनवून कारवाई केली पाहिजे.खरातला खतपाणी घालण्याचे काम राजकीय पुढाऱ्यांनीच केले आहे त्यामुळे खरातने आपल्या घृणास्पद कृत्यावर पकठ मजबूत ठेवली होती आणि आज उघडकीस आले तर सर्वच राजकीय पुढारी खरातच्या केसपासुन भोंदूबाबा म्हणून हात झाडण्याचे काम करीत आहेत हे राज्याचे दुर्भाग्य आहे.मी सरकारला विनंती करतो की महाराष्ट्राला खरातच्या कलंकापासुन वाचविण्यासाठी अशोक खरातची फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चौकशी करून संपूर्ण उलघडे करावेत व लवकरात लवकर अशोक खरातच्या गळ्यात फाशीचा दोर पडावा सोबतच खरात सोबत संबंध ठेवणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## इट्स ऑल अबाउट अशोका: सम्राट अशोकाचा पुनर्शोध आणि बौद्ध धर्माचा वारसा

भारतीय इतिहासाच्या पानांमध्ये सम्राट अशोक हे एक असे नाव आहे, ज्याने केवळ तलवारीच्या जोरावर नव्हे, तर प्रेमाच्या आणि धम्माच्या जोरावर जगावर राज्य केले. मौर्य साम्राज्याचा तिसरा सम्राट असलेल्या अशोकाचा काळ हा भारताचा सुवर्णकाळ मानला जातो. मात्र, आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ज्या राजाने अखंड भारतावर राज्य केले आणि ज्याचे नाव आशियाभर पसरले होते, तोच राजा भारतीय स्मृतीतून जवळपास एक हजार वर्षांहून अधिक काळ पूर्णपणे पुसला गेला होता.'इट्स ऑल अबाउट अशोका' या लेखात आपण हाच प्रवास पाहणार आहोत की, कसा एका विसरलेल्या सम्राटाचा शोध पुन्हा लागला आणि त्याचा बौद्ध धर्माचा इतिहास जगासमोर आला.अशोकाचा विसर आणि अंधकारमय काळ: मध्ययुगीन काळात भारतामध्ये अनेक स्थित्यंतरे झाली. या काळात मौर्य साम्राज्याचा इतिहास आणि विशेषतः सम्राट अशोकाचे कार्य विस्मृतीत गेले. धम्म लिपी वाचणारे कोणी उरले नव्हते आणि अशोकाने उभारलेले शिलालेख व स्तंभ केवळ 'भीमाची काठी' किंवा 'अज्ञात स्मारके' म्हणून ओळखले जाऊ लागले. पुराणांमध्ये अशोकाचा उल्लेख केवळ एका राजाच्या नावापुरता मर्यादित राहिला होता, परंतु त्याच्या महान कार्याची कोणतीही सविस्तर माहिती भारतीयांकडे उरली नव्हती.

इंग्रजांनी लावलेला शोध आणि जेम्स प्रिन्सेपचे योगदान:अशोकाचा हा विसरलेला इतिहास पुन्हा उजेडात आणण्याचे श्रेय प्रामुख्याने ब्रिटिश विद्वानांना जाते. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात अनेक जुन्या शिलालेखांचा शोध लागला. १८३७ मध्ये, कोलकाता येथील टांकसाळीचे अधिकारी आणि 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल'चे सचिव जेम्स प्रिन्सेप यांनी एक ऐतिहासिक कामगिरी केली. त्यांनी अनेक वर्षांच्या परिश्रमानंतर प्राचीन धम्म लिपीचे ( 'ब्राह्मी' लिपीचे) वाचन करण्यात यश मिळवले. या लिपीत लिहिलेल्या शिलालेखांमध्ये एका राजाचा उल्लेख वारंवार येत होता, ज्याचे नाव होते 'देवानांपिय पियदसी' (देवांचा लाडका, प्रियदर्शी राजा).'देवानांपिय पियदसी'चे रहस्य आणि जॉर्ज टर्नर: सुरुवातीला जेम्स प्रिन्सेपला वाटले की, हा राजा श्रीलंकेचा एखादा राजा असावा. परंतु, त्याच काळात श्रीलंकेत कार्यरत असलेले ब्रिटिश अधिकारी जॉर्ज टर्नर यांनी श्रीलंकेतील 'दीपवंश' आणि 'महावंश' या बौद्ध ग्रंथांचा अभ्यास केला होता. या ग्रंथांमध्ये स्पष्टपणे नमूद केले होते की, 'पियदसी' हे दुसरे तिसरे कोणी नसून मगधचा महान सम्राट अशोक आहे. या शोधामुळे भारतीय इतिहासातील एक मोठे कोडे सुटले आणि जगाला समजले की, हे सर्व शिलालेख आणि स्तंभ महान सम्राट अशोकाचे आहेत.मास्की शिलालेख: अंतिम पुरावा-जरी विद्वानांनी 'पियदसी' आणि 'अशोक' एकच असल्याचे मान्य केले होते, तरीही शिलालेखात प्रत्यक्ष 'अशोक' हे नाव कुठेही सापडत नव्हते. हे कोडे १९१५ मध्ये सुटले, जेव्हा सी. बीडन नावाच्या एका ब्रिटिश सुवर्ण खाण अभियंत्याला कर्नाटक राज्यातील मास्की येथे एक शिलालेख सापडला. या शिलालेखात स्पष्टपणे 'देवानांपिय असोकस' (देवांचा लाडका अशोक) असा उल्लेख होता. या शोधामुळे अशोकाच्या अस्तित्वावर आणि त्याच्या महानतेवर शिक्कामोर्तब झाले.कलिंग युद्ध आणि धम्म परिवर्तन:-अशोकाच्या आयुष्यातील सर्वात मोठे वळण म्हणजे 'कलिंगचे युद्ध' (इ.स.पू. २६१). या युद्धात झालेल्या भीषण रक्तपाताने अशोकाचे हृदय परिवर्तन झाले. त्याने 'भेरीघोष' (युद्धाचा आवाज) सोडून 'धम्मघोष' (धर्माचा आवाज) स्वीकारला. त्याने बौद्ध धर्माची दीक्षा घेतली आणि हिंसेचा मार्ग कायमचा त्याग केला. इथूनच 'चंडाशोक'चा 'धर्माशोक' होण्याचा प्रवास सुरू झाला. त्याने आपल्या प्रजेला मुलांप्रमाणे मानले आणि नैतिक मूल्यांवर आधारित 'धम्म' (धर्म) प्रसारित करण्यास सुरुवात केली.

बौद्ध धर्माचा इतिहास आणि जागतिक प्रसार-अशोकाने केवळ स्वतः बौद्ध धर्म स्वीकारला नाही, तर तो जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. त्याने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी श्रीलंकेला पाठवले. याशिवाय त्याने ग्रीस, इजिप्त, सीरिया आणि मध्य आशियातील देशांमध्ये आपले दूत पाठवले. अशोकाने ठिकठिकाणी ८४,००० स्तूप बांधले आणि खडकांवर व स्तंभांवर आपले विचार कोरले, जेणेकरणे येणाऱ्या पिढ्यांना शांती आणि अहिंसेचा संदेश मिळत राहील.

शिलालेख आणि स्तंभांचे महत्त्व:- अशोकाचे शिलालेख हे केवळ राजाचे आदेश नव्हते, तर ते मानवी मूल्यांचे जाहीरनामे होते. यामध्ये प्राण्यांची हत्या न करणे, आई-वडिलांचा आदर करणे, सर्व धर्मांचा सन्मान करणे आणि प्रजेच्या कल्याणासाठी काम करणे अशा सूचना होत्या. अलेक्झांडर कनिंगहॅम यांसारख्या पुरातत्वशास्त्रज्ञांनी भारताच्या विविध भागांतून हे स्तंभ आणि शिलालेख शोधून काढले, ज्यामुळे अशोकाच्या साम्राज्याची व्याप्ती आणि त्याच्या प्रशासकीय कौशल्याची माहिती जगाला मिळाली.

आधुनिक भारतावर अशोकाचा प्रभाव- आजचा आधुनिक भारत सम्राट अशोकाच्या वारशाशिवाय अपूर्ण आहे. भारताच्या राष्ट्रध्वजाच्या मध्यभागी असलेले 'अशोक चक्र' आणि भारताचे राष्ट्रीय बोधचिन्ह असलेले सारनाथ येथील 'सिंहमुद्रा' (डळेप उरलिंरश्र) हे सम्राट अशोकाचीच देणगी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील अशोकाच्या धम्मचक्राचा स्वीकार करून भारताला पुन्हा एकदा बुद्धाच्या मार्गावर नेण्याचे कार्य केले.

सम्राट अशोक हा केवळ भारताचाच नव्हे, तर जगाच्या इतिहासातील एक अद्वितीय राजा आहे. इंग्रज विद्वानांच्या संशोधनामुळे आणि बौद्ध ग्रंथांच्या पुराव्यामुळे हा 'महान सम्राट' पुन्हा एकदा भारताच्या नकाशावर ठळकपणे दिसू लागला. अशोकाचा इतिहास आपल्याला शिकवतो की, खरी सत्ता ही तलवारीने नाही, तर लोकांच्या हृदयावर प्रेम आणि करुणेने मिळवता येते. आजही अशोकाचा 'धम्म' जगाला शांतीचा मार्ग दाखवत आहे

.

**-विकी वामन येलवे**
**वकील उच्च न्यायालय मुंबई.**

## लातूरमध्ये विभागीय शिक्षण उपसंचालक दिपक चावणे यांचा पत्रकार संघाकडून सत्कार

लातूर : विभागीय शिक्षण उपसंचालक म्हणून नुकतेच लातूर येथे रुजू झालेले दिपक चावणे यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे , जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते , इले. प्रमुख हारून मोमीन , खय्युम शेख , तसेच अमर करकरे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमात दीपक चवणे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत, लातूर विभागातील शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी प्रभावी कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

आपल्या मनोगतात दिपक चवणे यांनी पत्रकार संघाचे आभार मानत, शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वाढविणे, शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

यावेळी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न मांडत प्रशासनाने त्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली. तसेच भविष्यात सकारात्मक समन्वयातून शिक्षण क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त करण्यात आली.

हा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण आणि आपुलकीच्या वातावरणात पार पडला.



## महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची पंतप्रधानांशी भेट

नवी दिल्ली, : महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा हे दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यांनी नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. ही सदिच्छा भेट पंतप्रधानांच्या कार्यालयात झाली. राज्यपालांचा पदभार स्वीकारल्यानंतर दिल्लीतील ही त्यांची पहिली भेट आहे.

# निवासी मालमत्ता करावरील शास्ती / व्याजामध्ये ९० टक्के सूट योजनेस ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ ; अनिवासी मालमत्तांनाही सवलत लागू

ठाणे : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांसाठी निवासी मालमत्ता करावरील शास्ती (दंड/ व्याज) मध्ये ९० टक्के सूट देण्याच्या योजनेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून असून या योजनेस ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देत असतानाच अनिवासी मालमत्ताधारकांनाही सूट देण्याचा निर्णय महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांनी घेतला आहे. तरी निवासी / अनविासी मालमत्ताधारकांसाठीही या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जे निवासी करदाते थकीत मालमत्ता कर, चालू वर्षाचा कर त्यांना आकारण्यात आलेल्या शास्तीच्या १० टक्के अशी एकत्रित रक्कम महापालिकेकडे जमा करण्याची मुदत २५ मार्च २०२६ पर्यंत ठेवण्यात आली होती, या योजनेस करदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता या योजनेस ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ निर्णय महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी घेतला असून करदात्यांचे आभार व्यक्त केले आहेत. तसेच अनिवासी मालमत्ताधारकांनाही ही योजना लागू केली आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जे निवासी / अनविासी करदाते थकीत मालमत्ता कर, चालू वर्षाचा कर त्यांना आकारण्यात आलेल्या शास्तीच्या १० टक्के अशी एकत्रित रक्कम महापालिकेकडे जमा करतील अशा निवासी / अनिवासी करदात्यांना त्यांच्या थकीत मालमत्ता करावर कराधान नियम ४१ (१) अन्वये आकारण्यात आलेल्या शास्तीमध्ये ९० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या करदात्यांनी या निर्णयापूर्वी त्यांचा निवासी / अनविासी मालमत्ता कर महापालिकेकडे जमा केला असेल, अशा करदात्यांना सदरची योजना लागू असणार आहे. या योजनेचा उद्देश नागरिकांना थकीत निवासी / अनिवासी मालमत्ता कर भरण्यास प्रोत्साहन देणे हा असल्याचे नमूद करीत महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी ही अंतिम संधी असल्याचे म्हटले आहे.

महापालिकेच्या प्रभाग समिती स्तरावरील सर्व संकलन केंद्रांवर कार्यालयीन दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी तसेच शनिवार-रविवारी सकाळी १०.३० ते दुपारी ४.०० या वेळेत कर भरता येणार आहे. तसेच महापालिकेच्या ु. ींहरपशलळीं.र्सीं.ळप‘ या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध असून त्रेस्रश्रश झरू, झहेपशझश, झर्ूीं आणि इक्खच् ॲपद्वारेही सुलभतेने कर जमा करु शकतील. करदात्यांना कराचे देयक पाहणे व कर भरणे सुलभ व्हावे यासाकरिता +९१२२२५३३१५९० या थर्हींर्ीं, उहर्रींं ही प्रणाली ठाणे महापालिकेने कार्यान्वति केली असून, करदाते याद्वारे देखील सुलभतेने कर जमा करु शकतील.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांनी या संधीचा लाभ घेऊन थकीत मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी केले आहे.

# रस्त्यावर बेकायदेशीर कर्जवसुलीविरोधात ॲड. श्वेता सराफ उतरल्या रस्त्यावर!

ठाणे : ठाण्यातील ॲड. श्वेता सराफ यांनी सार्वजनिक रस्त्यांवर कार्यरत असलेल्या बेकायदेशीर कर्ज वसुली एजंटांच्या वाढत्या उपस्थिती बद्दल कायदा आणि सुव्यवस्थेबाबत एक गंभीर चिंता औपचारिकपणे व्यक्त केली आहे. रस्त्यावर बेकायदेशीर पद्धतीने कर्जवसुली करणाऱ्या एजंटांविरोधात कठोर कारवाईची मागणी त्यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. काही अज्ञात व्यक्ती वाहन क्रमांकाची यादी घेवून रस्त्यावर वाहनचालकांना अडवून जबरदस्तीने कर्जवसुली करण्याचा प्रयत्न करत असल्याची गंळीर बाब समोर आली आहे.

असे निदर्शनास आले आहे की, काही अज्ञात व्यक्ती रस्त्याच्या मधोमध वाहने थांबवत आहेत, नागरिकांशी वाद घालत आहेत आणि बळजबरीने व बेकायदेशीर मार्गांनी कर्जाची रक्कम वसूल करण्याचा




प्रयत्न करत आहेत. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडे एक लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे, ज्यात असे नमूद केले आहे की, अशी कृत्ये बेकायदेशीर असून ती छळवणुकीच्या स्वरूपाची आहेत आणि सार्वजनिक सुरक्षा व सुव्यवस्थेला धोका निर्माण करतात. वसुली एजंटांना रस्त्यावर वाहने थांबवण्याचा किंवा वसुलीसाठी बळाचा वापर करण्याचा कोणताही अधिकार नाही.

वकील श्वेता सराफ यांनी सर्व नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि रस्त्यावर कोणतीही अज्ञात व्यक्ती अशी कृत्ये करताना दिसल्यास तात्काळ पोलिसांना कळवण्याचे आवाहनही केले आहे. त्यांनी यावर जोर दिला की, जबाबदार नागरिक म्हणून आपण कोणतीही बेकायदेशीर कृती सहन करू नये, जरी ती कर्ज थकवणाऱ्यांशी संबंधित समस्या असली तरी. कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही व्यक्तीचा छळ किंवा बेकायदेशीर वागणूक दिली जाऊ शकत नाही. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी जनतेचे सहकार्य आवश्यक आहे.

# अत्याधुनिक आरोग्य सेवेच्या सक्षमीकरणासाठी ‘पल्स वैंद्यकीय परिषद’ ठरणार दिशादर्शक वैंद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ

मुंबई, : राज्यातील प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ‘पल्स वैद्यकीय परिषद’ दिशादर्शक ठरणार आहे. २७ व २८ मार्च २०२६ रोजी जिओ कन्व्हेशन सेंटर येथे या दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वैद्यकीय व औषधी द्रव्ये मंत्री हसन मुश्रीफ यांनी यांच्या उपस्थितीत परिषदेचा उद्घाटन समारंभ पार पडणार आहे. देश तसेच विदेशातील वैद्यकीय क्षेत्रातील सुमारे २,९०० प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होणार आहेत. परिषदेत डिजिटल हेल्थ, कृत्रिम बुद्धिमत्ता, वैद्यकीय शिक्षणातील सुधारणा, कौशल्य विकास, संशोधन व नवकल्पना, तसेच ग्रामीण व सार्वजनिक आरोग्य बळकटीकरण या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.

राज्याचा सर्वांगिण विकास आणि



विकसित महाराष्ट्र २०४७ चे उद्दिष्ट गाठण्यासाठी ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि तंत्रज्ञानाधारित करणे आवश्यक असून, यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या परिषदेमुळे आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, औषधनिर्मिती उद्योग, स्टार्टअप आणि वेलनेस पर्यटन या क्षेत्रांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. परिषदेत देश-विदेशातील तज्ज्ञ, संशोधक, उद्योगपती आणि धोरणकर्ते सहभागी होणार असून त्यांच्या सहभागातून नवीन तंत्रज्ञान, आधुनिक उपचारपद्धती आणि गुंतवणुकीच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. यावेळी ३० विविध कंपन्या आणि संस्थांसोबत करार करण्यात येणार आहे.

आयुर्वेद आणि लोपॅथी यांचा समन्वय साधून एकात्मिक आरोग्य व्यवस्था विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. फार्मसी क्षेत्रातील नवीन संशोधन, डॉक्टरांचे संशोधन पेपर आणि नवकल्पनांचे सादरीकरणही परिषदेत होणार आहे. या माध्यमातून राज्याच्या मेडिकल टूरिझम आणि वेलनेस पर्यटनाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. ही परिषद केवळ चर्चे पुरती मर्यादित न राहता ठोस निर्णय, गुंतवणूक करार आणि धोरणात्मक बदल घडवून आणणारे व्यासपीठ ठरेल. त्यामुळे राज्यातील आरोग्य सेवा अधिक आधुनिक, परिणामकारक आणि सर्वसमावेशक होऊन ग्रामीण भागातही दर्जेदार सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केला.

# आमच्या जमिनीवर कायदेशीर केलेले अतिक्रमण तात्काळ काढून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा-किसन गिरी

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील सांगवी सा. येथील शेत जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमण करून आम्हाला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा अशी लेखी निवेदनाद्वारे मागणी शेतकरी किसन गिरी यांच्यासह त्यांच्या दोन मुलांनी केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्याकडे केली आहे. जर प्रशासनाने ८दिवसात संबंधितांवर गुन्हे दाखल न केल्यास नाविलाजास्तव आमरण उपोषण करण्याचा प्रशासनाला लेखी निवेदनाद्वारे शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे. सांगवी (सा.) येथील गिरी कुटुंबाला तात्काळ न्याय देऊन त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्ष पूर्ण ताकतीनिशी मैदानात उतरणार आहे असे माध्यमांशी बोलताना मराठवाडा अध्यक्ष भगवंत वायबसे यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे.



याबाबतची सविस्तर माहिती अशी की, किसन दिना गिरी, दिनेश किसन गिरी, गणेश किसन गिरी रा.सारणी येथील रहिवाशी आहेत त्यांची सांगवी (सा्.) शिवारामध्ये गट नंबर १० मध्ये ३ हेक्टर१७ एवढी जमीन आहे. किसन दिना गिरी यांनी सन१९९५ मध्ये ३ गुंठे जमीन ही आत्मउन्नती विश्वशांती सद्गुरु स्वानंद प्रेमळ मंडळ सारणी (सा.) पिंपळगाव या नावाने दान दिलेली आहे. आज रोजी काही समाजकंटक लोकांनी हेतू पुरस्करपणे दान दिलेली तीन गुंठे जागा सोडून किसन गिरी यांच्या हक्कातील जमिनीवर दंडमशाही, दडपशाहीने शासकीय सभागृह इमारत व सार्वजनिक स्वच्छताग्रहाचे बांधकाम केलेले आहे.

दिनांक १८ मार्च २०२६ रोजी दुपारी ३-०० वाजता काल्याचे किर्तन संपल्यावर गावातील काही लोक स्व. मताचे गोळा करून सरपंच पती संजय रामकृष्ण केदार व रमेश श्रीराम धस यांनी गोळा केलेले लोक घेऊन किसन गिरी यांच्या दिशेने आले व त्यांना म्हणाले या ठिकाणी गावच्या पार्किंग, किचन शेड व व्यायाम शाळेचे बांधकाम करून द्या अन्यथा तुमचे हात पाय या जमिनीवर येण्यासाठी आम्ही ठेवणार नाहीत् तुम्ही जर जास्त नाटक केल्यावर तुमच्यावर गावातील लोकांना खोटे गुन्हे दाखल करायला लावू, ट्रॉसिटी करू ग्रामपंचायत माजी आहे तुम्हाला माहिती नाही का? कोणी माझे काही वाकडे करू शकत नाहीत त्यामुळे नीट राहा अन्यथा या जमिनीत तुम्हाला पाय ठेवू देणार नाहीत. असे सरपंच पती श्री संजय केदार यांनी गिरी यांच्या लहान मुलाच्या कॉलरला धरून धमकावले त्याचबरोबर रमेश श्रीराम धस हे म्हणाले की, माझे नातेवाईक हे मंत्रालयामध्ये आहेत तुम्हाला खालून वरपर्यंत कोठेही सोडणार नाही गोसाव्यांनी नीट अवकातीत राहा भीक मागून खाणारे तुम्ही लोक तुम्हाला एवढी जमीन कशाला हवी अशा प्रकारच्या किसन गिरी व त्यांच्या मुलाला धक्काबुक्की, शिवीगाळ करून त्या ठिकाणावरून हाकलून दिले.

दिनांक १९ मार्च २०२६ रोजी दुपारी १२-०० वाजता किसनगिरी यांचा मोठा मुलगा दिनेश गिरी व दयानंद मनोहर गिरी हे दोघेजण शेतात गेले असता जीसीबी मशीन द्वारे मंदिरा लगतच्या जवरीचे पीक जमिनी उद्धस्त करून साप करताना दिसले. सदर घटनेचे ते फोटो काढत असताना सरपंच पतीची टोळी त्यांच्या दिशेने धावली. सरपंच पती यांना म्हणाले यांना धरा आपण यांना जेसीबी खाली टाकू, त्यावेळी जीव वाचविण्यासाठी तेथून दिनेश गिरी व दयानंद गिरी हे पळून घरी गेले असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात गिरी कुटुंबांनी म्हटले आहे.

सदरचे निवेदन हे तहसीलदार राकेश यांनी स्वीकारले आहे या लेखी निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री, पोलीस महासंचालक, सामाजिक न्याय मंत्री, जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, पोलीस अधीक्षक बीड यांना देण्यात आल्या आहेत.

या निवेदनावर किसन दिना गिरी, दिनेश किसन गिरी, गणेश किसन गिरी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी डिजिटल साक्षरता महत्त्वाची महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

मुंबई: ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेच्या माध्यमातून अनेक महिलांनी बचतीतून लघुउद्योग सुरू केले आहेत. अशा अनेक महिलांना महिला विकास मंडळाच्या माध्यमातून दिले जाणारे प्रशिक्षण, अनुदान आणि भांडवल यामुळे महिलांना व्यवसाय उभारण्यासाठी तसेच, उत्पादने बाजारपेठेत पोहोचविण्यासाठीही मोठा आधार मिळत आहे. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करताना त्यांना डिजिटल आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.महिला विकास मंडळाच्या सभागृहात लर्निंग लिंक्स फाउंडेशन आणि मास्टरकार्ड यांच्या सहकार्याने आयोजित भांडवल व अनुदान वितरण समारंभात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमात महिला उद्योजकांना धनादेश, शिवणयंत्र तसेच घरगुती चक्की व्यवसाय सुरू करण्यासाठी साहित्य देण्यात आले. यावेळी महिला आर्थिक विकास महामंडळाचे रायगड जिल्ह्याचे जिल्हा समन्वय अधिकारी विजय ढोके, मास्टर कार्डचे उपाध्यक्ष हरीश बाबु एसएन, वरिष्ठ व्यवस्थापक सरत चंद्रन, लर्निंग लिंक फाउंडेशनचे ट्रस्टी ग्री नाथन, वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक अपूर्वा शिंदे यांच्यासह विविध संस्था, माविम आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाचे अधिकारी उपस्थित होते.मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, ग्रामीण भागातील अनेक महिला ऑनलाईन व्यवहार करत असताना डिजिटल प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्याने त्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. त्यामुळे व्यवसाय सुरू करणाऱ्या महिलांना




डिजिटल साक्षर करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.सिंधुदुर्ग, पुणे आणि रायगड जिल्ह्यांत सुरू असलेले हे कार्य राज्यभर विस्तारावे, जेणेकरून अधिकाधिक ग्रामीण महिलांना व्यवसायाच्या संधी मिळतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. महिला व बालविकास विभाग, महिला विकास मंडळ आणि सामाजिक संस्थांनी समन्वयाने काम करून हा लाभ अधिक महिलांपर्यंत पोहोचवावा, असेही त्या म्हणाल्या.मुख्यमंत्री ‘माझी लाडकी बहीण’ योजनेतून मिळालेल्या रकमेची शिस्तबद्ध बचत करून अनेक महिलांनी स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारल्याची प्रेरणादायी उदाहरणे पुढे येत आहेत. पुण्यातील रिद्धी वाकणकर यांनी सुमारे सहा महिने रक्कम जमा करून सोप बेस, मुलतानी माती आणि डाळिंबाच्या सालीची पावडर यांसारखा कच्चा माल खरेदी केला. त्यातून त्यांनी घरगुती आयुर्वेदिक उत्पादनांचा व्यवसाय सुरू केला. आज त्या घरची जबाबदारी सांभाळत स्वतःचा लघुउद्योगही यशस्वीपणे चालवत आहेत. या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या जोरावर त्या आपल्या मुलीचे शिक्षण पूर्ण करत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, पुण्यातील भोसरी येथील स्नेहा कांबळे यांची कहाणीही तितकीच प्रेरणादायी आहे. ज्वेलरी बनवण्याची आवड आणि स्वतःचा उद्योग सुरू करण्याची इच्छा असूनही आर्थिक अडचणींमुळे त्यांना हे शक्य होत नव्हते. मात्र ‘लाडकी बहीण’ योजनेतून मिळणाऱ्या दरमहा दीड हजार रुपयांची बचत करून त्यांनी कच्चा माल खरेदी केला आणि हँडमेड ज्वेलरी तयार करण्यास सुरुवात केली. आज त्या विविध प्रदर्शनांमध्ये आपली उत्पादने विकत असून, हळूहळू त्यांचा व्यवसाय वाढत आहे. सध्या त्यांच्या कडे सुमारे ५० हजार रुपयांचा कच्चा माल असून प्रत्येक प्रदर्शनातून त्यांना ५ ते ७ हजार रुपयांचे उत्पन्न मिळत आहे.याच पार्श्वभूमीवर आयोजित वार्षिक ‘सशक्ती कॉन्क्लेव्ह २०२५-२६’ मध्ये महिला उद्योजकांच्या यशाचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमातून महिलांना व्यवसायासाठी प्रोत्साहन, वित्तीय सुविधा आणि विविध शासकीय विभागांशी समन्वय साधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. ‘सशक्त महिला उद्योजकता कार्यक्रम हा पहिल्या आणि दुसऱ्या पिढीतील कमी उत्पन्न गटातील महिला उद्योजकांना आर्थिक साक्षरता, डिजिटल साधने आणि व्यवसाय नियोजन कौशल्य देण्यासाठी तयार करण्यात आलेला एक अनोखा उपक्रम आहे.लर्निंग लिंक्स फाउंडेशनद्वारे राबविण्यात येणारा आणि मास्टरकार्डच्या सहकार्याने चालणारा हा कार्यक्रम २०२२ पासून महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात, कर्नाटक, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये पोहोचला आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.